नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २५/०३/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक १४/०१/२०२० चे १८.५५ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. २२/२०२० कलम ३५४ (ड), ५०६ भादवी सहकलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ११/०१/२०२० चे ०४.३० वा. दरम्यान १६ वर्षीय पिडीत/फिर्यादी मुलगी ही कॉलेज मध्ये जात येत असता आरोपी नामे — अरबाज हफीज शेख, वय २० वर्ष, रा. एमआयडीसी कळमेश्वर याने तिला 'तु माझ्याशी बाल व लग्न कर नाहीतर तुझ्या वडीलांना जिवानिशी ठार मारीन अशी धमकी देवून तिचा विनयभंग केला. सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मसपोनि अमृता चवरे, पो.स्टे. कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक २५/०३/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. एस. आर. त्रिवेदी, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३४५(ड) भादवी कायद्यामध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व २०००/—रु. दंड व दंड न भरल्यास २ महिने साधी कैद, तसेच कलम ५०६ भादंवि मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व २०००/—रु. दंड व दंड न भरल्यास २ महिने साधी कैद शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती कल्पना पांडे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. प्रमोद कडबे, श्री. सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी यांनी मदत केली आहे.

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. रामटेक** :— दिनांक २०/०५/२०१६ चे १८.४५ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे अप. क्र. १४३/२०१६ कलम ३०७, ३५४ भादवी सहकलम १० बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २०/०५/२०१६ चे ०७.०० वा. ते ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी यांची मुलगी वय १३ वर्ष ही शौचास गेली असता घरी परत येत असतांना आरोपी नामे— महेश शिवबालक रौतेल, वय ५५ वर्ष, रा. प्रेमनगर कांद्री कन्हान माईन मन्सर याने तिला एकटी पाहून तिचा विनयभंग केला तिने नकार दिल्याने आरोपीने धारधार शस्त्राने तिच्या गळयावर, कानावर, हातावर, गालावर वार करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. आरोपीला दिनांक २१/०५/२०१६ चे १२.०८ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. मल्हारी ताडीगोटे पो.स्टे. रामटेक यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक २५/०३/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती. एस. ए. श्रीखंडे, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५४ भादंवि. आणि ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये मध्ये ३ वर्ष सश्रम

कारावास व १,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास प्रत्येकी ३ महिने सश्रम कारावास शिक्षा, कलम ३२६ भादंवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास आणि ३,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती रश्मी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी पोशि श्री ईश्वर हुड यांनी मदत केली आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कुही** :— दिनांक १२/१०/२०१६ चे १४.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— रमेश दौलतराव भोयर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अप. क्र. २०७/२०१६ कलम ३०४, ४९८ (अ), ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०३/१०/२०१६ चे १०.४० वा. दरम्यान आरोपी नामे— क्र. १. उमेश कवडुजी ठवकर, वय ३६ वर्ष, २. सचिन उर्फ लिलाधर कवडुजी ठवकर वय ३१ वर्ष व ३. सौ. कमल कवडुजी ठवकर, वय ६५ वर्ष, तीन्ही रा. अकोली त. कुही जि. नागपूर यांनी संगणमत करून फिर्यादीची मुलगी नामे— सौ. अंकीता उमेश ठवकर हिला हुंडयाचे २ लाख रू व सोन्याची गोप माहेरून आण्ण्यास तगादा लावून तिचा शारीरिक छळ करून मारपीट केल्याने त्या त्रासाला कंटाळुन तिने घरी ठेवलेली किटकनाशक विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान मरण पावली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. गोंधळे पो.स्टे. कुही यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २५/०३/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती. आर. एस. पावसकर, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद तीन्ही आरोपीतांना कलम ४९८ (अ), ३४ भादंवि. मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व २५,०००/—रु. दंड प्रत्येकी व दंड न भरल्यास ९ महिने सश्रम कारावास शिक्षा, तसेच कलम ३०४(ब), ३४ भादंवि मध्ये ७ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. डागोरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. सुनिल डोंगरे, श्री भवानीप्रसाद मिश्रा, पोहवा श्री. मनोज तिवारी मपोना शितल मेश्राम यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर